पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.शहर सुधारणा समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - ४

**सभावृत्तांत**

दिनांक - **०३/११/२०१५** वेळ - दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा मंगळवार दिनांक **०३/११/२०१५** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.सौ.स्वाती प्रमोद साने - सभापती**
२. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद
३. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे
४. मा.पालांडे सुजाता सुनिल
५. मा.पाटील सुजित वसंत
६. मा.चौंधे आरती सुरेश
७. मा.बारणे निलेश हिरामण

या शिवाय मा.दंडवते - सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.रत्नपारखी – कार्यकारी अभियंता, मा.ऐवले – समाज विकास अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

दिनांक २१/१०/२०१५ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक ३)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक – ३० विषय क्रमांक – ०१
दिनांक – ०३/११/२०१५ विभाग – नगररचना व विकास
सुचक – मा.सुजाता पालांडे अनुमोदक – मा.निलेश बारणे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/१३/५४/२०१५, दि.११/०५/२०१५

विषय - पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण मंजूर विकास योजनेतील मौजे भोसरी येथील दक्षिणोत्तर १२.० मी. रुंद रस्त्यापासून ते एम.आय.डी.सी. हद्दीपर्यंत स.नं.१५ पै. व स.नं.१४ पै.मधील २४ व १२ मी. रुंद (पूर्व-पश्चिम) रस्त्याचे भूसंपादनाबाबत...

विषय क्रमांक ०१ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३१ विषय क्रमांक – ०२

दिनांक – ०३/११/२०१५ विभाग – नगररचना व विकास

सुचक – मा.आरती चौंधे अनुमोदक – मा.अमिना पानसरे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/पिं.गुरव/टे-८/६८८६/२०१५, दि.०१/१०/२०१५

विषय - मौजे पिंपळे गुरव येथील स.नं.७९ पैकी व ८० पैकी जागेत आरक्षण क्र.३५६, “ प्राथमिक शाळा विस्तार ” चे जमिनीचे भूसंपादन करणेबाबत ...

विषय क्रमांक २ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( सौ.स्वाती प्रमोद साने )**
**सभापती**
शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/७६५/२०१५
दिनांक : ०४/११/२०१५



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकड पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.